| दिनांक 25/03/2025 |
|---|
| **1.** पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 23/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी ही कोणाला काहीएक न सांगता घरातून निघून गेली आहे ती अदयापपर्यंत घरी परत आली नाही. अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणाकरीता फुस लावून फिर्यादी यांचे संमती शिवाय पळवून नेली.<br>याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे गुरनं.18/2025, भा.न्या.सं 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई सतीश शिंदे हे करीत आहेत. |
| **2.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 23/03/2025 रोजी 22:45 वा ते दि. 24/03/2025 रोजी 22:45 वा. च्या दरम्यान मौजे चैतन्यछाया अपार्टमेंट ब्राम्हणआळी दहिवली ता कर्जत येथे फिर्यादी यांनी त्यांचे मालकीची एकूण 60,000/- रुपये व किमतीचे मोटारसायकल त्यांचे बिल्डींगचे पार्कींगमध्ये हॅण्डल लॉक करून लावलेली असताना अज्ञात आरोपीत याने सदरचे मोटारसायकलचा हॅण्डल लॉक तोडून फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे हेतुने स्वत:चे फायदयाकरीता सदरची मोटारसायकल चोरी करून चोरून नेली.<br>याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 86/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 303(2) .अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/स्वप्नील येरुणकर हे करीत आहेत. |
| **3.** पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 23/03/2025 रोजी 18:00 वा ते दि. 24/03/2025 रोजी 18:00 वा च्या दरम्यान मौजे पुई पो-सिध्देश्वर ता-सुधागड येथील बसवि-यात आलेल्या चालु स्थितीतील विध्दुत ट्रान्सफॉरमरची कोणीतरी अज्ञात इसमाने स्वतःच्या फायदयाकरीता लबाडीच्या हेतुने तोडफोड करूनएकूण 20000/- रुपये किमतीचा त्यामधील कॉपर कॉईलची चोरी केली.<br>याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं. 30/2025, भा-न्या-सं-2023 चे कलम 303(2),324(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सचिन कारभारी हे करीत आहेत. |
| **4.** सायबर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 13:35 वा ते दि. 22/03/2025 रोजी 13:35 वा च्या दरम्यान फिर्यादी यांची दि. 08/03/2025 त दि. 22/03/2025 या |

कालावधीत बिर्ला ओपस या कंपनीचे बोगस वेबसाईट वरून अज्ञात इसमाने फिर्यादी यांना बिर्ला ओपस कंपनीचे डिस्टीब्युटरशिप देणार असे सांगुन फिर्यादी यांचे कडुन बँक ऑफ माहराष्ट्र खाते क्रमांक बँक खात्यात पैसे गुंतवण्यास सांगुन विश्वास संपादन करून फिर्यादी यांची 3,90,800/- रूपयांची फसवणुक केली.

याबाबत सायबर पोलीस ठाणे गुरनं.3/2025, BNS 318 (4) , 316 (2) , माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 (2008 चे सुधारणेसह) 66(C), 66 (D) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि श्रीमती. आर.जी.नदाफ ह्या करीत आहेत.

**5.** म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे सकलप फाटा म्हसळा ते श्रीवर्धन जाणा-या सिमेंट रोडवर, ता.म्हसळा येथे ताब्यातील ढंपर क्र एम.एच.43 बी.पी.7843 मध्ये श्रीवर्धन येथुन बॉक्साईड भरुन श्रीवर्धन म्हसळा रोडने जात असताना सकलप फाटा म्हसळा ते श्रीवर्धन जाणा-या सिमेंट रोडवर आलेवेळी त्याने त्याचे ताब्यातील ढंपर भरधाव वेगात ,हयगयीने, निष्काळजीपणाने, रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवीत येउन रस्त्याचे बाजुला असलेल्या दरडीला ठोकर मारुन अपघात करुन त्या अपघातात स्वत:चे डोक्यास,हाताला,पोटाला गंभीर स्वरुपाच्या दुखापती होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत होवुन ढंपरच्या नुकसाणीस कारणीभुत झाला व डॉक्टरांनी तपासुन त्यास मयत झाल्याचे घोषीत केले.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं.20/2025 भा.दं.वि.क. 106, 281,125A,125B,(BNS), मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/पालोदे हे करीत आहेत.

## दारूबंदी केसेस

**1.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 13:30 वा च्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मौजे वाडगाव बापदेव मंदीरा जवळ ता.अलिबाग येथे आरोपीत रा.वाडगाव ता.अलिबाग याने एकुण 20,880/- रुपये किमतीचा गावठी हातभट्टीची तयार दारु व देशी विदेशी दारु असा प्रोव्ह माल गैरकायदा,विनापरवाना विक्रीकरीता त्याचे ताबे कब्जात बाळगेल्या स्थितीत मिळुन आला.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.54/2025दारूबंदी अधिनियम, 1949, इतर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/मगर हे करीत आहेत

## वाहतूक केसेस

दिनांक 24.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 255 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,57,350/-रुपये इतका दंड आकारला आहे.